## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एइएमएल सिप्झ लि.च्या सिप्झ एसईझेड, मुंबई येथील बहु-उत्पादन विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२३**

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/एएसएल सिप्झ एईझेड/२०२३/-----:** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालील विनियम करीत आहेः-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ**

१.१ या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एइएमएल सिप्झ लि.च्या सिप्झ एसईझेड, मुंबई येथील बहु-उत्पादन विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२३ असे म्हणावे.

१.२ हे विनियम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांनी दि. २० जानेवारी, १९७५ आणि २८ जून, २००५ रोजीच्या भाडेपट्टा विलेखा अन्वये भाडेपट्टयाने दिलेल्या १०३ एकर क्षेत्रासाठी आणि सांताक्रुझ इलेक्ट्रॉनिक एक्सपोर्ट प्रोसेसिंग झोन (सिप्झ) एसईझेड ऑथॉरिटी आणि एइएमएल सिप्झ लिमिटेड (एएसएल) यांच्यामध्ये दि. ८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या सह-विकासक करारामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, लागू राहतील;

| अनु. क्र. | करार/विलेखाचा तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | भूखंड क्र. एफ-१ येथील सुमारे ९२ एकर क्षेत्रासाठी एमआयडीसी आणि सिप्झ एसईझेड यांच्यामधील भाडेपट्टा विलेख | २० जानेवारी, १९७५ |
| | सिप्झ++ म्हणून ओळखल्या जाणा-या ११ एकर अतिरिक्त क्षेत्रासाठी एमआयडीसी आणि सिप्झ एसईझेड यांच्यामधील भाडेपट्टा विलेख | २८ जून, २००५ |
| २ | सिप्झ एसईझेड ऑथॉरिटी आणि एइएमएल सिप्झ लिमिटेड (एएसएल) यांच्याधील सह-विकासक करार | ८ सप्टेंबर, २०२१ |
| **सिप्झ एसईझेडचे एकूण क्षेत्र** | | **१०३ एकर** |

१.३ हे विनियम **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२ व्याख्या :**

**२.१** या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

(ए) **“अधिनियम”** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(बी) **“एएसएल ”** चा अर्थ, मे. एइएमएल सिप्झ लिमिटेड, जे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत झालेले आहेत आणि ज्यांना सांताक्रुझ इलेक्ट्रॉनिक एक्सपोर्ट प्रोसेसिंग झोन, अंधेरी पूर्व, मुंबई येथील एसईझेडसाठी सिप्झ एसईझेड ऑथॉरिटी यांच्यासोबत दि. ८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या सह-विकासक करारान्वये आणि भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांच्या दि. २६ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या मान्यता पत्रान्वये सह-विकासक म्हणून मान्यता मिळालेली आहे;

(सी) **“सह-विकासक”** चा अर्थ, एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (एफ) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील;

(डी) **“विकासक”** चा अर्थ, एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील;

(इ) **“मानीव वितरण परवानाधारक”** म्हणजे सह-विकासक एएसएल, ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. ३ मार्च, २०१० च्या अधिसूचना क्र. एस.ओ. ५२८ (ई) द्वारा विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, भाडेपट्टा विलेख आणि वरील खंड १.२ मध्ये संदर्भित केलेल्या सह-विकासक करारामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे;

(एफ) **“सर्वसाधारण अटी”** म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी;

(जी) **“एसईझेड अधिनियम”** म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५;

(एच) **“विशेष आर्थिक क्षेत्र” किंवा एसईझेड”** म्हणजे एसईझेड अधिनियमाच्या कलम ३ च्या उप-कलम (४) चे परंतुक आणि कलम ४ च्या उप-कलम (१) च्या परंतुकांतर्गत (मुक्त व्यापार आणि गोदाम क्षेत्रासह) अधिसूचित करण्यात आलेले प्रत्येक विशेष आर्थिक क्षेत्र होय आणि त्यामध्ये विद्यमान विशेष आर्थिक क्षेत्राचा समावेश राहील.

(जी) **"एसईझेड नियम"** म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेले विशेष आर्थिक क्षेत्र नियम २००६.

२.२ (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांच्या व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द आणि उक्तींना, विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार, अर्थ राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

## ३ व्याप्ती

'एएसएल'च्या संदर्भातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी या 'एएसएल'च्या वीज वितरण परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या विजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

## ४ "वितरणाचे क्षेत्र" किंवा "पुरवठ्याचे क्षेत्र"

४.१ मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज पुरवठ्याचे क्षेत्र हे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांनी दि. २० जानेवारी, १९७५ आणि २८ जून, २००५ रोजीच्या भाडेपट्टा विलेखा अन्वये भाडेपट्टयाने दिलेले आणि दि. ८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या सह-विकासक करारामध्ये विचारात घेतलेले, उपरोल्लेखित विलेख/ करारांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबी यांच्या अधीन राहून, सांताक्रुझ इलेक्ट्रॉनिक एक्सपोर्ट प्रोसेसिंग झोन, अंधेरी (पूर्व) येथील १०३ एकरचे क्षेत्र राहील, जे खालील तक्त्यात संक्षिप्तपणे नमूद करण्यात आले आहे :

| अनु. क्र. | करार/विलेखाचा तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | भूखंड क्र. एफ-१ येथील सुमारे ९२ एकरसाठी एमआयडीसी आणि सिप्झ एसईझेड यांच्यामधील भाडेपट्टा विलेख | २० जानेवारी, १९७५ |
| | सिप्झ++ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ११ एकरसाठी अतिरिक्त क्षेत्रासाठी एमआयडीसी आणि सिप्झ एसईझेड यांच्यामधील भाडेपट्टा विलेख | २८ जून, २००५ |

| अनु. क्र. | करार/विलेखाचा तपशील | दिनांक |
|---|---|---|
| २ | सिप्झ एसईझेड ऑथॉरिटी आणि एइएमएल सिप्झ लिमिटेड एएसएल यांच्याधील सह-विकासक करार | ८ सप्टेंबर, २०२१ |
| **सिप्झ एसईझेडचे एकूण क्षेत्र** | | **१०३ एकर** |

पुरवठ्याच्या क्षेत्राच्या नकाशामध्ये सदर क्षेत्र अधिक विशिष्टपणे आरेखित करण्यात आले आहे आणि हा नकाशा मानीव वितरण परवानाधारकाने आयोगाकडे सुपुर्द केला आहे. **अनुसूची - १** मध्ये हा नकाशा जोडण्यात आला आहे.

४.२ एएसएलचा मानीव परवानाधारक दर्जा एसईझेडच्या विकासकाच्या मान्यतेशी समवर्ती राहील, म्हणजे जर एसईझेड क्षेत्र अंशतः किंवा पूर्णत निरधिसूचित करण्यात आले तर, एएसएल अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून संबंधित क्षेत्रासाठी मानीव वितरण परवानाधारक म्हणून असलेला त्याचा दर्जा गमावेल.

४.३ त्याचप्रमाणे, एसईझेडसाठी सह-विकासक म्हणून एएसएलचे निलंबन/समाप्ती किंवा भाडेपट्टीची मुदत संपणे इ. सारख्या घटनांच्या बाबतीत, एएसएल अशा घटनेच्या दिनांकापासून मानीव परवानाधारक म्हणून असलेला त्याचा दर्जा गमावेल.

४.४ भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून भविष्यात एसईझेड अधिसूचना किंवा निरधिसूचना काढण्यात आल्यास, एसईझेड क्षेत्रामध्ये बदल झाला तर, किंवा एसईझेडसाठी सह-विकासक म्हणून एएसएलचे निलंबन/समाप्ती किंवा भाडेपट्टीची मुदत संपणे इ. सारख्या घटनांच्या बाबतीत, मानीव वितरण परवानाधारक, अशा घटनेपासून १५ दिवसांच्या आत ‘एएसएल’बाबतच्या या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि सदर क्षेत्रातील ग्राहकांच्या हितासाठी वीज पुरवठ्याच्या अंतरिम व्यवस्थेबाबत निर्देश मागण्यासाठी, आयोगाशी संपर्क साधेल.

## ५. परवान्याची मुदत

सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, दि. ६ जून, २०२२ पासून (म्हणजेच उपरोल्लेखित एसईझेडसाठी एएसएलचा मानीव वितरण परवानाधारक दर्जा पटलावर घेण्यासाठी आयोगाने सन २०२२ च्या प्रकरण क्र. २ मध्ये दिलेल्या आदेशाच्या दिनांकापासून) दि. ५ जून, २०४७ पर्यंतच्या पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीकरिता अंमलात राहील.

## ६. विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी

हे विनियम अधिसूचित झाल्याच्या दिनांकानंतर त्वरित मानीव वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहण्यासाठी पुरविण्याची तरतूद करील.

## ७ अखंडीत विजेचा पुरवठा

मानीव वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात दिवसाचे चोवीस (२४) तास अखंडित विजेचा पुरवठा करण्यासाठी व्यवस्था करील.

## ८ दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, अल्प-बदल आणि सुधारणा करु शकेल.


## ९ अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

अभिजीत देशपांडे
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक : -- जानेवारी, २०२३

**अनुसूची - १**




LAYOUT OF SEEPZ